**स.फौ.के. नं. ८१/२०१९**
**नि. क्र. ५४**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०९ यांचा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**माझे नाव –** स्मिता संतोष कुवळेकर,
**वय –** ५६ **वर्षे, व्यवसाय –** शेती, **राहणार –** निवळी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून–</u>**

**०१.** दिनांक २८/१२/२०१८ रोजी मी माझ्या आईला डॉक्टरांकडे नेत होते. त्यासाठी मी निवळी येथे हजर होते. माझ्या आईला मी संगमेश्वर येथील डॉक्टरांकडे एस.टी. बस–निवळी, नरदेवाडी, संगमेश्वर या एस.टी. बसने नेत होते. सदरच्या एस.टी. बसमध्ये सकाळी ०५:४५ वाजता निवळी येथे मी आईसह बसले होते. आम्ही बसमध्ये चौथ्या क्रमांकाच्या सिटवर बसलो होतो. आमच्या एस.टी.मध्ये २० ते २२ आणखी प्रवासी होते.

**०२.** निवळी येथुन सदरची एस.टी. बस वाघजाई गाव मंदीराच्या कापाचीवाडी येथे आली. तेथे सदर एस.टी वेगात आली. तो भाग वळणाचा होता. सदर एस.टी. बस डावीकडुन उजवीकडे पलटी झाली. तेथे डाव्या बाजुला डोंगर होता व उजव्या बाजुला दरी होती. सदरच्या दरीत एस.टी. बस पलटी झाली होती. अपघातामुळे माझ्या हाताला, पायाला, मानेला दुखापत झाली होती. बाकी प्रवाशांना देखील दुखापती झाल्या होत्या. माझ्या आईला अपघातामुळे कोणतीही दुखापत झाली नाही. नेरदवाडी येथील एका महिलेला तिच्या डोक्याला व तोंडाला दुखापत झाली होती. दरीमध्ये एका झाडामध्ये एस.टी. बस अडकली होती. कापाचीवाडी येथील लोकांनी आम्हाला एस.टी. बसच्या खिडकीमधुन बाहेर काढले. त्या लोकांनी रुग्णवाहीकेमधुन आम्हाला संगमेश्वर येथील सरकारी दवाखान्यात उपचाराकामी दाखल करण्यात आले. संध्याकाळी ०५:०० वाजता आम्हाला दवाखान्यातुन सोडण्यात आले. सदर एस. टी. बसचा क्रमांक २४३२ असा आहे. सदर एस.टी. बसच्या चालकाला मी ओळखत नाही. पोलीसांनी माझ्याकडे दवाखान्यात चौकशी केली होती.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. पी. मांगले यांचेकडून</u> –**

**०३.** त्यावेळी मी दोन सीट क्षमतेच्या चौथ्या क्रमांकाच्या सीटवर बसले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या सीटवर बसल्यामुळे पुढच्या बाजुस काय घडले, हे दिसु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गाडीचा वेग किती होता, हे देखील मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळीचा भाग घाटाचा व चढ–उताराचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे गाडीचा वेग जास्त नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळीच्या रस्त्याच्या उजव्या बाजुला दरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा रस्ता हा १० फूट रुंदीचा असुन त्याला साईडपट्टी नव्हती.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, सकाळच्या वेळेस गावातील लोक गुरे चरण्यासाठी सोडतात. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळीच्या डाव्या बाजुला असलेल्या डोंगराळ भागात त्यावेळी गुरे चरण्यासाठी सोडलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी मी रतन घडशी, अपर्णा वनगे व प्रतिक्षा वनगे असे सर्वजन आम्ही एकत्र न्यायालयात आलो आहोत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांकडे नोंदविलेला तपासटिपण मी वाचलेले होते.

**०५.** ***प्रश्नः*** *सदर एस.टी. बस चे ब्रेक निकामी झाल्यामुळे अपघात झाला होता, हे खरे का ?*

***उत्तरः*** *मला यावर काहीच सांगायचे नाही.*

**०६.** हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>.**

**<u>फेरतपास नाही</u>.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI Date: 2025.09.11 18:31:54 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ११/०९/२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of evidence | :- | 11/09/2025 |
| evidence signed by PO. on | :- | 11/09/2025 |
| evidence uploaded on | :- | 11/09/2025 |